नियमित दिवाणी मुकदमा क्र. १०९/२०१८

(श्रीमती रत्नप्रभा रेवाडकर – वादी वि. श्री. प्रकाश दाभोलकर वगैरे –प्रतिवादी)

**:– नि. ५९ खालील आदेश –:**

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं. १अ मयत झाल्या असून त्यांचेविरुध्द दावा उपशमित झालेला आहे. तरी सदरचा आदेश रद्द होवून प्रतिवादी क्र. १अ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे अर्जातील कथन की, प्रतिवादी क्र. १अ मयत झाल्यानंतर त्यांचा मृत्यु दाखला वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना मुदतीत त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्याचे कामी सामील करण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. १अ चे विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. तरी प्रतिवादी क्र. १अ चे विरुध्द दावा उपशमित झाल्याचा आदेश रद्द होवून प्रतिवादी नं.१अ चे वारस अभिलेखावर घेण्यात यावेत अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३. प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन वादी यांनी उशीराने अर्ज दाखल केलेला असून सदरील वारस मुदतीत दाखल केलेले नाहीत तरी खर्चासहीत अर्ज मंजुर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते . त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

५. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १अ या दिनांक २६/०५/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी क्र. १अ चे वारस मुदतीत अभिलेखावर दाखल न केल्यामुळे प्रतिवादी क्र. १अ विरुध्द दावा

उपशमित झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, हक्कप्रस्थापना व दावा मिळकतीचे धडेवाटप होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे . त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादी क्र. १अ विरुध्द झालेला दावा उपशमितचा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १अ चे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज अतिशय विलंबाने दिलेला असल्यामुळे त्याच्यावर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. नि.५९ कडील अर्ज वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये १००/- (रुपये शंभर मात्र ) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी क्र. १अ विरुध्द दावा उपशमित झाल्याबाबत करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2023.02.14 11:07:39 +0530

दिनांक–१३/०२/२०२३

(अ. जो. बाचुळकर)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.